तात्काळ

सरकारी-निमसरकारी कर्मचारी-शिक्षक संघटना समन्वय समिती यांनी दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ रोजी पुकारलेल्या संपाबाबत करावयाची कार्यवाही.

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक, क्रमांक : एसटीके-१०११/प्र.क्र.२८७/११/१६-अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ८ नोव्हेंबर,२०११

## परिपत्रक

सरकारी-निमसरकारी कर्मचारी-शिक्षक संघटना समन्वय समिती, महाराष्ट्र यांनी त्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ रोजी संप पुकारला आहे. सदर समन्वय समितीच्या निमंत्रकांनी संपात सरकारी-निमसरकारी कर्मचारी, शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी इत्यादी सर्व सहभागी होणार असल्याची दिनांक २४ ऑक्टोबर, २०११ ची नोटीस शासनास दिली आहे. महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे सरचिटणीस यांनी दिनांक २१ ऑक्टोबर, २०११ च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ रोजी अधिकाऱ्यांनीही संप करावा, असे अधिकारी महासंघाच्या राज्य कार्यकारिणीने सूचविले आहे. सदर संपामध्ये राज्य शासकीय/निमशासकीय इत्यादी कर्मचाऱ्यांच्या/अधिकाऱ्यांच्या विविध संघटनांचे सदस्य सामील होण्याची शक्यता आहे.

२. दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ रोजी होणाऱ्या संपकाळात शासकीय कामकाज सुरळीतरित्या चालण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना आणि जिल्हा परिषदा/महानगरपालिका/नगर परिषदा इत्यादी कार्यालयांना पुढे दर्शविल्याप्रमाणे उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

अ) शासकीय कर्मचाऱ्यांनी संपात भाग घेणे गैरवर्तणूक समजण्यात येईल व अशा कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारचे आदेश निर्गमित करण्यात यावेत व ते सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्या आदेशाची प्रत सूचना फलकावर लावण्यात यावी.

ब) कर्मचाऱ्यांनी संपात भाग न घेण्याविषयी व नेहमीप्रमाणे कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करावा.

क) संपकाळात कार्यालये उघडण्याची व बंद करण्याची योग्य ती व्यवस्था करावी व ती व्यवस्था जबाबदार अधिकाऱ्यांकडे द्यावी. गरज भासल्यास गृहरक्षक दलाची मदत घ्यावी.

ड) कार्यालयप्रमुखांनी संपकाळात आपले मुख्यालय सोडून जावू नये.

इ) कार्यालय प्रमुखांनी या आदेशाच्या दिनांकापासून लाक्षणिक संप संपेपर्यंत कोणत्याही शासकीय कर्मचा-यास कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये आणि जे कर्मचारी रजेवर असतील अशा प्रत्येक प्रकरणी विचार करून त्यांची रजा रद्द करून त्यांना कामावर तात्काळ बोलवावे किंवा कसे ते ठरवावे.

ई) शासकीय कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचे 'काम नाही वेतन नाही' हे धोरण राज्य शासनही अनुसरत असल्याचे कर्मचाऱ्यांना अवगत करावे.

३. सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये संपकाळात अत्यावश्यक सेवा सुरळीत चालू राहतील याबाबत उपाययोजना करावयात.

४. मंत्रालयीन विभागांनी या परिपत्रकातील सूचना विभाग प्रमुखांना / त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालय प्रमुखांना कळविण्याची व्यवस्था करावी.

५. सदर संपाच्या दिवशी कार्यालयात उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी संबंधित मंत्रालयीन विभागांना कळवावी व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या विभागातील व अधिपत्याखालील कार्यालयांची संकलित माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ रोजी दुपारी १२.०० पर्यंत या विभागाच्या कार्यासन १६-अ, नवीन प्रशासन भवन, १३ वा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांजकडे द्यावी. तसेच सर्व विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयात, आणि सर्व जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यामधील सर्व शासकीय/निमशासकीय-जिल्हा परिषदा/महानगरपालिका/नगर परिषदा इत्यादी मधील कार्यालयात संपाच्या दिवशी असणाऱ्या उपस्थितीची टक्केवारी दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत फॅक्सने (क्र.०२२-२२८४३७११/२२०२७३६५) या विभागाकडे पाठवावी.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक२०१११०५११४९२५००१ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सु. ना. रणखांबे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव,

---

जा.क्रं.विकापु/आस्था-१ /२०११/ ९३८९

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे
दिनांक : ११ नोहेंबर २०११ 11 NOV 2011

प्रतिलिपी १)प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे/कराड/अवसरी/औषधनिर्माण महाविद्यालय कराड
२)प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन कराड/अवसरी/पुणे /सोलापूर/कोल्हापूर/मिरज/तासगांव
३)प्राचार्य, शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन पुणे ४) प्राचार्य म.रा.हॉटेल मॅनेजमेंट केटरिंग टेक्नॉलाली पुणे
४)उपसचिव, परीक्षा मंडळ विभागीय कार्यालय पुणे

त्यांना कळविण्यात येते की, वर शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी तसेच सोबत जोडलेल्या प्रपत्र अ,ब, व क मध्ये आवश्यक ती माहिती भरुन संबधित आयुक्त व जिल्हाधिकारी यांना विहीत वेळेत कळविण्यात यावी. तसेच माहितीची एक प्रत या कार्यालयास दिनांक १५.११.२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता या फॅक्सद्वारे / ईमेलद्वारे नचुकता सादर करण्यात यावी.

(डी.एन.शिंगाडे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत- आस्था-३ब/४/यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी
प्रत- संगणक विभाग संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी तसेच सर्व संस्थाप्रमुखांना ईमेल करण्यासाठी

शासन परिपत्रक, क्रमांक : एसटीके-२०११/प्र.क्र.२८७/११/१६-अ, दिनांक ८ नोव्हेंबर, २०११ चे प्रपत्र.

## प्रपत्र - अ

मंत्रालयीन विभागातील/त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबतची माहिती.

### मंत्रालयीन विभाग

| एकूण कर्मचाऱ्यांची संख्या | पूर्व परवानगीने रजेवर असलेले (संख्या) | संपात सहभागी झालेले (संख्या) | कार्यालयात उपस्थित असलेले (संख्या) |
|---|---|---|---|
| अ. | | | |
| ब. | | | |
| क. | | | |
| ड. | | | |

## प्रपत्र - ब

### विभागीय आयुक्त यांनी सादर करावयाची माहिती

| एकूण कर्मचाऱ्यांची संख्या | पूर्व परवानगीने रजेवर असलेले (संख्या) | संपात सहभागी झालेले (संख्या) | कार्यालयात उपस्थित असलेले (संख्या) |
|---|---|---|---|
| अ. | | | |
| ब. | | | |
| क. | | | |
| ड | | | |

## प्रपत्र - क

### प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांनी सादर करावयाची माहिती

| एकूण कर्मचाऱ्यांची संख्या | पूर्व परवानगीने रजेवर असलेले (संख्या) | संपात सहभागी झालेले (संख्या) | कार्यालयात उपस्थित असलेले (संख्या) |
|---|---|---|---|
| अ | | | |
| ब | | | |
| क. | | | |
| ड. | | | |